# ‘सीएसएमटी’मध्ये नवा भुयारी मार्ग

| रोजचे प्रवासी | सीएसएमटी (रेल्वे) | सीएसएमटी (मेट्रो) |
|---|---|---|
| | ११,२०,८५० | १.६० लाख अपेक्षित |

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मेट्रो-३ कार्यान्वित झाल्यावर प्रवाशांसाठी नवा मार्ग तयार होणार आहे. मेट्रो ३वरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो स्थानक आणि रेल्वेचे सीएसएमटी स्थानक यांच्या जोडणीसाठी हिमालय पुलाखाली नवीन भुयारी मार्ग बांधण्याची योजना तयार झाली आहे. रेल्वे, मेट्रो आणि राज्य सरकार यांच्या बैठकीत मुख्य सचिवांनी नव्या मार्गाला तत्त्वत: मंजुरी दिली आहे. सध्याच्या भुयारी मार्गातील गर्दीवर हा उपाय असणार आहे. नव्या भुयारी मार्गासाठी व्यवहार्यता अभ्यास प्रशासनाने सुरू केला आहे.




### या यंत्रणांचा सहभाग

- रेल्वे भूमी विकास प्राधिकरण (आरएलडीए)
- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी)
- मध्य रेल्वे
- राज्य सरकार

### नव्या भुयारी मार्गाचा तपशील

| लांबी | जमिनीपासून खोली : | खर्च विभागणी रेल्वे-मेट्रो |
|---|---|---|
| ३१६ मीटर | १३ मीटर | ५०:५० टक्के |
| खर्च : व्यवहार्यतेनंतर खर्च निश्चित होणार | | |

### सध्याचा भुयारी मार्ग

सध्या सीएसएमटी ते हजारीमल सोमानी मार्ग यांना जोडणारा भुयारी मार्ग आहे. याला सीएसएमटी मेट्रो स्थानकातील एका मार्गाची जोडणी देण्यात आली असून, सध्या याचे काम सुरू आहे. मार्गातील दुतर्फा फेरीवाल्यांमुळे सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत मार्गावरून चालणे प्रवाशांना त्रासाचे ठरते. मेट्रो प्रवाशांमुळे यात आणखी भर पडणार आहे.

### क्रॉफर्ड मार्केटकडे जाण्यासाठीही उपयुक्त

फोर्ट, आझाद मैदानाच्या दिशेने येणारे पादचारी सध्याच्या भुयारी मार्गाने सीएसएमटी फूटपाथ व महापालिका फूटपाथमार्गे क्रॉफर्ड आणि मनीष मार्केटमध्ये पोहोचतात. नव्या भुयारी मार्गामुळे क्रॉफर्ड आणि मनीष मार्केटच्या दिशेला बाहेर पडण्यासाठी जोड रस्ता देण्यात येणार आहे

### नव्या भुयारी मार्गाची सद्यस्थिती

- नव्या भुयारी मार्गाला रेल्वे, मेट्रो आणि राज्य सरकार यांच्या बैठकीत मंजुरी मिळाली आहे.
- प्रवाशांच्या सुविधेसाठी सरकते जिने आणि प्रशस्त वायू-विजन यंत्रणा बसविणार
- मार्गाच्या व्यवहार्यतेची तपासणी सुरू